RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784

वर्ष ३ रे | अंक : २२५ वा | बुधवार दि ३० ऑक्टोबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

जिल्हा रुग्णालय भ्रष्टाचारप्रकरणी राज्य व केंद्रातील आरोग्य मंत्री ढिम्म का?

केंद्रीय आयुष राज्यमंत्री भ्रष्टाचाराबाबत बनले धृतराष्ट्र, राज्यातील मंत्र्यांचीही तीच स्थिती

माजी केबिनेट मंत्री राजेंद्र शिंगणे व बुलडाणा आमदार संजुभाऊ गायकवाड यांनी दोन वेळा या भ्रष्टाचार प्रकरणात झालेल्या अधिवेशनात तारांकित प्रश्न मांडूनही अद्याप पर्यंत कारवाई नाही.

जनसंचलन/बुलढाणा

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील भ्रष्टाचार प्रकरणी एकीकडे राज्य व केंद्रातील शासनाचे अधिकारी जाणुनबुजून डोळेझाक करीत आहेतच,परंतु राज्य व केंद्र सरकारमधील मंत्री एका प्रमाणाच्या बाहेर ढिम्म असल्याचे दिसत आहे. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे तर बुलढाण्याचेच खासदार आहेत.परंतु या भ्रष्टाचाराबाबत तेही धृतराष्ट्र बनल्याचे दिसत आहेत, तर राज्याचे आरोग्य मंत्री अबीटकर हे देखील या भ्रष्टाचाराकडे कानाडोळा करीत असल्याचे स्पष्ट होत आहे. येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात बोकाळलेला भ्रष्टाचार हा आता भ्रष्टाचाराचा अक्षरशः भस्मासूर बनला आहे. कारण या भ्रष्टाचाराचा आकडा हा कोण्याही सामान्य माणसाच्या कल्पनाशक्तीच्या बाहेर गेलेला आहे. कोरोना १९ महामारीच्या आधीपासून या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो आहे. विशेष म्हणजे जिल्हा सामान्य रुग्णालयातील असा एकही विभाग नाही, ज्या विभागात भ्रष्टाचार बोकाळलेला नाही. कॅशबुकात झालेल्या खोडाखोडीपासून ते पुढे मॉड्युलर ओटी रूमच्या बोगस व अर्धवट बांधकामापर्यंत तसेच चढ्या दराने जिल्हा रुग्णालयात उपकरणे व औषधी खरेदीपर्यंत भ्रष्टाचाराच्या धुक्याने संपूर्ण जिल्हा सामान्य रुग्णालयाचे सगळे विभाग व्यापून टाकलेले आहेत.भ्रष्टाचाराचे अत्यंत उत्तम नमुने या ठिकाणी उघडकीस आलेले आहेत. भ्रष्टाचारात या ठिकाणच्या अधिकाऱ्यांना अक्षरशः डॉक्टरेट द्यावी,अशी स्थिती आहे. इतके नवोन्मेषी भ्रष्टाचाराचे मार्ग या ठिकाणच्या अधिकाऱ्यांनी शोधून काढलेले आहेत. त्यामुळे या ठिकाणी घडलेल्या भ्रष्टाचाराचा आकडा हा शेकडो कोटींच्या घरात पोहोचला आहे. सामाजिक कार्यकर्ते असो किंवा पत्रकार असो सर्वच जण या भ्रष्टाचाराविरोधात ओरड करीत असतात.परंतु कुठल्याही प्रकारची कारवाई होत नसल्याचे या ठिकाणी स्पष्ट दिसून येत आहे.जिल्हा रुग्णालयातील या भ्रष्टाचार प्रकरणी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या वतीने सातत्याने भंडाफोड करून अधिकाऱ्यांचे काळे कारनामे जनतेच्या समोर ठेवण्याचे काम केले आहे. एव्हढेच नाही तर भ्रष्टाचाराचे पुरावे देखील देशाचे आयुष राज्यमंत्री नामदार प्रतापराव जाधव आणि राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश अबीटकर यांच्याकडे सोपवलेले आहेत.वरिष्ठ अधिकारी या भ्रष्टाचार प्रकरणी बोटचेपी भूमिका घेत असल्या कारणाने मग दैनिक जनसंचलनच्या वतीने व सिटी न्यूज ने भ्रष्टाचाराची सर्व माहिती पुराव्यांनिशी मंत्र्यांकडे दिली. मात्र, अधिकाऱ्यांपेक्षाही मंत्री किती ढिसाळ आणि भ्रष्टाचाराला खतपाणी घालणार आहेत, हे मंत्र्यांनी आपल्या ढिम्म कामकाजाने सिद्ध केले.नामदार प्रतापराव जाधव यांच्याकडून भ्रष्टाचाऱ्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची अपेक्षा होती. एकीकडे या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ना खाऊंगा ना खाने दूंगा अशी घोषणा करून भ्रष्टाचारविरोधातील आपली भूमिका स्पष्ट करतात,मात्र त्यांच्याच मंत्रिमंडळातील आयुष मंत्री हे भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करणयात कुचराई करीत असल्याचे दिसत आहे. राज्य शासन देखील भ्रष्टाचाराबाबत अत्यंत ढिसाळ असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. कारण नामदार अबीटकर यांच्याकडेही सविस्तर माहिती देऊन आता बराच काळ उलटून गेला आहे. तरी देखील कोणावरही अद्याप कारवाई झालेली नाही.बहुचर्चित महाभ्रष्टाचारी अधिकारी प्रकाश बोथे राहणार उच्चप्रभु वस्ती गोरक्षण रोड परिसर यांच्यावर तर चौकशी आयोगात ठपका ठेवण्यात आलेला आहे. त्यांची चल अचल संपत्ती जप्त करण्याची शिफारस देखील करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या चौकशी समितीत असणारे तत्कालीन उपसंचालक अकोला

डॉ कमलेश भंडारी हे नंतर आरोग्य विभागात सहायक आयुक्त देखील बनले, परंतु तरीही या प्रकरणी कोणीही भ्रष्टाचाऱ्यांविरोधात कारवाई केलेली नाही.आता वरिष्ठ अधिकारी व मंत्री हे कारवाईसाठी कुठल्या मुहुर्ताची वाट पाहत आहेत, हे अगदी न समजण्यासारखे आहे. अशाप्रकारे केंद्रीय व राज्याचे मंत्री जर भ्रष्टाचाऱ्यांना अभय देत असतील तर मग राज्यातून व देशातून भ्रष्टाचार कधीही संपू शकणार नाही. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी व मंत्र्यांनी भ्रष्टाचाऱ्यांनाची नाही तर कमीत कमी पदाची तरी लाज बाळगावी. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज काही केल्या जोपर्यंत भ्रष्टाचाऱ्यांकडून शासनाच्या विशेष निधीत केलेला करोडो रुपयांचा भ्रष्टाचार व त्यातून केलेली करोडो रुपयांची चल अचल संपत्तीचे लिलाव करून येणारी सर्व रक्कम शासन तिजोरीत जमा करून दोषींना जेलची वारी घडवत नाही, तोपर्यंत आपले अभियान थांवणार नाही. भ्रष्टाचार करणारे आणि भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालणारे कोणीही असो त्यांची गय दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज करणार नाही. आगामी काळात सातत्याने भ्रष्टाचाऱ्यांविरोधात कारवाई का केली नाही, याचा जाब केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश अबीटकर यांना विचारत राहणार आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाला वसूलीचा नशा? गांगलगावात अवैध दारूचा महापूर!

जनसंचलन/ चिखली

चिखली तालुक्यातील मौजे गांगलगाव येथे अवैध दारूचा महापूर वाहत असून,राज्य उत्पादन शुल्क विभाग कर्तव्यशुन्य दिसून येत असून विभागाला वसूलीचा नशा चढल्याचा आरोप होत आहे. पोलीस देखील थातूरमातूर करवाई करतात. गांगलगाव येथे अवैध देशी, विदेशी व हातभट्टी दारूची राजरोस विक्री होत असून, दारूविक्री बंद करण्याची तक्रार लहुजी शक्ती सेनेचे युवा जिल्हा कार्याध्यक्ष मुकेश पंजाबराव खरात, गणेश सुभाष खरात, गोपाल अजबराव गायकवाड यांनी अंढेरा पोलीस स्टेशन यांना २७ऑक्टोबर रोजी एका निवेदनाद्वारे केली आहे. तक्रारीत म्हटले की, अंढेरा पोलीस स्टेशन हद्दीतील मौजे गांगलगावातील अवैद्य दारु विक्री तात्काळ बंद करावी न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालय भवन गांगलगाव येथे बेमुदत ठिय्या आंदोलन करणार आहे. अवैध देशी दारूमुळे गावातील शांतता भंग झाली आहे. गावातील रस्त्यावर या अवैध दारूमुळे दारुड्याकडून सतत गोंधळ घातल्या जात असून या प्रकारामुळे संपूर्ण गाव त्रस्त झाले आहे. महिलांना दारुड्या कडून मारहाण होण्याचे प्रमाणही वाढले आहे. अनेक संसार उघड्यावर आले आहेत. या बाबतीत गांभीर्यपूर्वक पाऊल उचलणे आवश्यक आहे. या बाबत अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार रुपेश शक्करगे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला असता त्यांनी की आम्ही गांगलगाव

येथे गेलो असता गावांमध्ये अवैध दारू मिळवून आली नाही. तक्रारकर्ते सुद्धा आमच्या सोबत होते.

...वारसदाराची पदोन्नती...

संपादकीय लेख

भाषेच्या राजकारणाला सर्वदूर उकळी आलेली असताना बांगलादेशी नावाची काही भाषा नसते. तसे म्हणणे हा बंगाली भाषा बोलणाऱ्यांची सांस्कृतिक ओळख पुसण्याचा प्रयत्न आहे,फ असे म्हणत दिल्ली पोलिसांच्या चुकीवर बोट ठेवून ङ्गतृणमूलफ्चे खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून परवाच माफीची मागणी केली होती. याची चर्चा सुरू असतानाच अभिषेक यांची तृणमूल काँग्रेस पक्षाच्या लोकसभेतील नेतेपदी निवड झाल्याची घोषणा अध्यक्ष ममता बॅनर्जी यांनी केली. या तरुण नेत्याची पदोन्नती तशी अपेक्षितच होती, कारण त्यांचे पूर्वसूरी सुदीप बंदोपाध्याय यांची प्रकृती गेले काही दिवस बरी नव्हती. पश्चिम बंगालमध्ये तब्बल ३४ वर्षे सत्तेत असलेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या सरकारचा पराभव करून २०११मध्ये तृणमूल काँग्रेसने सत्तेत पाऊल ठेवले. या विजयासोबत अभिषेक यांनीही तृणमूल युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम सुरू केले. डायमंड हार्बर मतदारसंघातून ते २०१४मध्ये लोकसभेवर निवडून गेले. त्या वेळी ते सभागृहातील सर्वांत तरुण खासदार होते. अभिषेक यांनी २०१९च्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या प्रतिस्पर्ध्याला ३२०,५९४ मतांनी पराभूत केले आणि गेल्या वर्षी सलग तिसऱ्यांदा ७,१०,९३० मतांनी विजय मिळवून त्यांनी स्वत:चाच विक्रम मोडला. अनेक संसदीय समित्यांवर त्यांनी काम केलेय. ममता या अभिषेक यांची आत्या. अभिषेक हे त्यांचे राजकीय वारसदार आहेत, हे लपून राहिलेले नाही. दिल्लीच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ प्लॅनिंग अँड मॅनेजमेंटमधून त्यांनी एमबीएची पदवी घेतलीय. त्यांच्या पत्नी रुजिरा या थायलंडच्या नागरिक आहेत. अभिषेक यांना त्यांच्या आत्याकडून वक्तृत्वाचा वारसा लाभलाय. त्यांची मुद्देसूद, आक्रमक आणि अभ्यासपूर्ण भाषणे लोकांच्या मनाचा ठाव घेतात. ङ्गइंडिया आघाडीफ्त अभिषेक समन्वय समितीचे सदस्य आहेत. आता लोकसभेत तृणमूलचा ते मुख्य चेहरा असतीलच; यासोबत ते तृणमूलचा भावी नेता असतील, हा संदेशही ममता यांनी या नियुक्तीमधून दिला आहे

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

बच्चू कडूंच्या आंदोलनात आता मनोज जरांगेंची एन्ट्री, मुख्यमंत्री उद्या कर्जमाफीचा निर्णय घेणार?

नागपूर : राज्य सरकारचं टेन्शन वाढवणारी बातमी समोर येत आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांच्या नेतृत्वात नागपूरमध्ये भव्य आंदोलन सुरु आहे. बच्च कडू यांच्या आंदोलनाला विविध शेतकरी संघटनांनी पाठिंबा दिला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी, अखिल भारतीय किसान सभेचे नेते अजित नवले यांच्यासह अनेक नेते या आंदोलनात थेट सहभागी झाले. यानंतर आता मराठा नेते मनोज जरांगे पाटील हे देखील नागपूरच्या दिशेला रवाना झाल्याची माहिती समोर येत आहे. मनोज जरांगे पाटील हे देखील बच्चू कडू यांच्या आंदोलनात सहभागी होणार आहेत. त्यामुळे आगामी काळात मोठ्या घडाम ोडी घडण्याचे संकेत मिळत आहेत.

बच्चू कडूंनी पुकारलेल्या आंदोलनाने चार महामार्गांची वाहतूक ठप्प केली. त्यामुळे राज्य सरकारचं टेन्शन वाढलं होतं. विशेष म्हणजे कोर्टात या प्रकरणी सुमोटो याचिका दाखल झाली. कोर्टाने संध्याकाळी सहा वाजेपर्यंत आंदोलनस्थळ रिकामं करण्याचे आदेश दिले. बच्चू कडू यानंतर नागपूर पोलिसांकडे स्वत:हून अटक होण्यासाठी पायी निघाले होते. त्यांच्यासह हजारो आंदोलक पोलीस ठाण्याच्या दिशेला निघाले होते. या दरम्यान एक महत्त्वाची माहिती समोर आली.राज्य सरकारचं शिष्टमंडळ रात्री आठ वाजता बच्चू कडू यांच्या भेटीसाठी नागपुरात दाखल झालं. राज्य सरकारकडून मंत्री पंकज भोयर, मंत्री आशिय जयस्वाल या दोन मंत्र्यांच्या शिष्टमंडळाने नागपुरात खापरी येथे भेट घेतली. यावेळी सरकारच्या शिष्टमंडळातील मंत्र्यांचं आणि आंदोलकांच्या शिष्टमंडळाचं जवळपास तासभर चर्चा झाली. प्रसारमाध्यमांच्या कॅमेऱ्यासमोर ही चर्चा झाली. या दरम्यान सरकारचं शिष्टमंडळ वरिष्ठांसोबत बोलण्यासाठी बाजूला गेलं होतं.यानंतर बच्चू कडू यांची मनधरणी करण्यात शिष्टमंडळाला यश आलं. बच्चू कडू यांच्या मागण्यांबाबत चर्चा करण्यासाठी शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेण्याची विनंती केली. त्यानुसार बच्चू कडू यांचं शिष्टमंडळ उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे. असं असलं तरी आंदोलन रात्रभर सुरुच राहणार असल्याची भूमिका बच्चू कडू यांनी मांडली. तसेच मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी गेलो असता आंदोलकांना प्रशासनाकडून कोणताही त्रास होणार नाही, अशी ग्वाही बच्चू कडू यांनी सरकारच्या शिष्टमंडळाकडून घेतली.दुसरीकडे मनोज जरांगे आज रात्री उशिरा आंदोलनस्थळी दाखल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या आंदोलनाला आणखी बळ मिळण्याची शक्यता आहे. 'शेतकरी सगळे नागपुरला बसले आहेत. ज्यावेळेस अटीतटीची वेळ असते त्यावेळेस आपण आपल्या शेतकरी मायबापांसाठी सगळ्यांनी सहकार्य केलं पाहिजे. नागपूरची परिस्थिती कशी झाली, तिथले गोरगरीब, दिव्यांग बांधव बसले आहेत. तिथे शेतकरी वर्ग बसला आहे. तिथे खूप अटीतटीची वेळ आहे.

बिहारी नेत्यांच्या तोंडी देवाभाऊंची भाषा

पाटणा : बिहारच्या राजकारण मुख्यमंत्रिपदावरुन राजकारण जोरात सुरु आहे. बिहारमध्ये सत्ताधारी एनडीए विरुद्ध विरोधी बाकांवरील महागठबंधन असा थेट सामना आहे. महागठबंधननं मुख्यमंत्रिपदासाठी राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांचं नाव जाहीर केलं आहे. मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार जाहीर करण्याचं आव्हान महागठबंधनकडून एनडीएला दिलं जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करणं टाळलं आहे. तर दुसरीकडे भाजपचे वरिष्ठ नेते रविशंकर प्रसाद यांनी एनडीएमध्ये मुख्यमंत्रिपदासाठी नितीश कुमार यांचाच चेहरा असल्याचं सांगितलं आहे.नितीश कुमार गेल्या २० वर्षांपासून एनडीएचे नेते आहेत आणि पुढेही राहतील, असं रविशंकर प्रसाद म्हणाले आहेत. मुख्यमंत्रिपदासाठी कोणतीही व्हॅकेन्सी नसल्याचं प्रसाद यांनी म्हटलं आहे. नितीश कुमार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जोडी पहाडासारखी

मजबूत असल्याचं प्रसाद यांनी सांगितलं. बिहारला नवीन व्हिजन देण्याचा दावा करणारे ४२० चे आरोपी आहेत.

राष्ट्रीय जनता दल म्हणजे भ्रष्टाचाराची शाळा आहे. लालू प्रसाद यादव यांचं संपूर्ण कुटुंब भ्रष्टाचारात आकंठ बुडालेलं आहे, अशी टीका प्रसाद यांनी केली. दिवाळीच्या दिवसांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना वापरलेली भाषा आता बिहारमध्ये रविशंकर प्रसाद यांनी वापरली आहे. फडणवीस दिल्लीला जातील. त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळात संधी दिली जाईल किंवा भाजपचं अध्यक्षपद मिळेल, अशी चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून आहे.

शिवसेनेचे सर्वाधिक नगर सेवक पण महापौर दुसराच

छत्रपती संभाजीनगर : राज्यात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पक्ष कामाला लागले आहेत. आगामी म हापालिका निवडणुका या वेगळ्या असणार आहेत. कारण यावेळी शिवसेना आणि राष्ट्र वादी काँग्रेस पक्ष दोन गटात विभागले गेले आहेत. छत्रपती संभाजीनगर महापालिका शिवसेनेचा बालेकिल्ला राहिलेला आहे. पण आता शिवसेनेत दोन गट पडले आहेत. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या निवडणुकीकडे राज्याचं लक्ष असणार आहे. या निवडणुकीत कोणता पक्ष सर्वांवर भारी पडतो? ते पाहणं महत्त्वाचं आहे. काँग्रेसकडून क्रांती चौक वार्डातून निवडून आलेले नगरसेवक डॉ. शांताराम यशवंतराव काळे यांचं नाव महापौर पदासाठी सुचवण्यात आलं. याम ुळे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे पहिले महापौर डॉ.यशवंतराव काळे झाले होते.

भाजपला प्रस्ताव, महाशक्तीला २ ऑफर

मुंबई : विधानसभा निवडणुकीत पानीपत झाल्यानंतर ठाकरे बंधूंची जवळीक वाढत आहे. गेल्या चार महिन्यांत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंच्या झालेल्या भेटी, चर्चा पाहता शिवसेना उबाठा आणि मनसे यांची युती जवळपास निश्चित मानली जात आहे. त्यामुळे भाजप नं सावध पवित्रा घेतला आहे. मुंबईत महायुती एकत्र लढेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्यानं सांगत आहेत. ठाणे, पुणे, नवी मुंबईत भाजप स्वबळासाठी आग्रही आहे. पण मुंबईत महायुतीला शिंदेसेनेची सोबत हवी आहे. या परिस्थितीचा फायदा घेत शिंदेसेनेनं भाजपला जागावाटपासाठी प्रस्ताव दिले आहेत.२०१७ नंतर मुंबई महापालिकेची निवडणूक झालेली नाही. त्यावेळी राज्यात भाजप आणि शिवसेनेचं सरकार होतं. दोन्ही पक्ष स्वबळावर लढले. एकसंध असलेल्या शिवसेनेनं ८४, तर भाजपनं ८२ जागा जिंकल्या. गेल्या ८ वर्षांमध्ये परिस्थिती बरीच बदलली आहे. २०१७ मध्ये विजयी झालेले निम्मे नगरसेवक शिंदेसेनेत गेले

आहेत. त्यामुळे उद्धव ठाकरेंच्या पक्षाची ताकद घटली आहे. पक्षात फूट पडल्यानं झालेलं नुकसान राज ठाकरेंच्या मनसेला सोबत घेत भरुन काढण्याचा उद्धव यांचा प्रयत्न आहे.उद्धव ठाकरेंच्या पक्षाची मुंबईत अद्यापही ताकद आहे. त्यात राज यांच्या मनसेसोबत त्यांची युती झाल्यास ठाकरे बंधू भाजप समोर आव्हान उभं करु शकतात. त्यामुळेच मुंबईत भाजपला शिंदेसेना सोबत हवी आहे. याची जाणीव असलेल्या शिंदेसेनेनं मुंबईत ८० ते ८५ जागा मागितल्या आहेत. तसा प्रस्ताव भाजपला देण्यात आला आला आहे. मागील निवडणुकीत एकसंध शिवसेनेनं जिंकलेल्या सगळ्या जागांसाठी शिंदेसेना आग्रही आहे.

आणखी एक बडा नेता अडचणीत येणार? धंगेकरांचं पुढचं टार्गेट फिक्स, आदित्य ठाकरेंनीही डाव साधला..

पुणे : पुण्यातील भाजप नेत्यांवर शिवसेनेचे पुणे महानगर प्रमुख रवींद्र धंगेकर यांनी आरोपांची मालिका सुरूच ठेवली आहे. सुरुवातीला गुंड निलेश घायवळ प्रकरणी रवींद्र धंगेकर यांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले. त्यानंतर जैन बोर्डिंग जमिनीच्या संदर्भात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर रवींद्र धंगेकर यांनी आरोपांची राळ ठेवली होती. चंद्रकांत पाटील आणि मुरलीधर मोहोळ यांच्यानंतर आता रवींद्र धंगेकर यांनी आपलं पुढचं टार्गेट फिक्स केलं आहे. कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने हे रवींद्र धंगेकर यांचं पुढचं टार्गेट असल्याचे संकेत त्यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत दिले होते.पुण्यातील लोकमान्य नगर वसाहतीमध्ये हेमंत रासने यांनी पुनर्विकासाला विरोध करत या वसाहतीच्या क्लस्टर डेव्हलपमेंटसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून या काम ाला स्थगिती मिळवली असल्याचा आरोप रवींद्र धंगेकर यांनी केला आहे. या प्रकरणात आपण खोलवर जाणार असून यामधील दोषींना सोडणार नसल्याचे रवींद्र धंगेकर म्हणाले होते. धंगेकरांनीहे प्रकरण हाती घेण्याआधीच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आणि माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी लोकमान्य नगर वसाहतीच्या

पुनर्विकास संदर्भात द पोस्ट करत थेट महायुती सरकारलाच आरोपीच्या कटघड्यात उभं केलं आहे.निवडणुक आयोगाच्या कृपेने आलेलं म हाराष्ट्रातलं सरकार अल्पावधीतच 'बिल्डर-कंत्राटदारांचं सरकार' झालंय. पुण्यातल्या लोकमान्य नगरचंच उदाहरण पहा. तिथल्या पुर्नविकासाचा मार्ग स्थानिक रहिवाश्यांनी निवडला असताना आणि त्यांना तो विकास हवा असतानाही, अचानक स्थानिक आमदाराच्या पत्रावर थेट मुख्यमंत्री कार्यालयाने ह्या पुर्नविकासाला स्थगिती दिली. झटक्यात असं करण्याचं कारण काय होतं? आता 'क्लस्टर' विकासाच्या नावाखाली ही जागा सत्ताधाऱ्यांच्याच जवळच्या एका बिल्डरच्या ताब्यात देण्याचा प्रयत्न सुरु झालाय का? स्थानिकांचं काय म्हणणं आहे हे ऐकून न घेता जर मुख्यमंत्री हा निर्णय घेत असतील तर सरकार नेमकं कोणाचं आहे? सरकार हे जनतेचं आहे की बिल्डर्सचं?' असे सवाल आदित्य ठाकरे यांनी केले आहेत. आदित्य ठाकरे यांच्या या आरोपांनंतर आता पुण्यामध्ये आणखी हेमंत रासने यांच्या रूपाने एका भाजप नेत्याच्या अडचणीत वाढ होण्याचे चित्र आहे.लोकमान्यनगर परिसरात १९६० ते १९६४ या काळात एकूण ५३ इमारतींचे बांधकाम करण्यात आले होते. सध्या या परिसरात सुमारे ८०३ कुटुंबे राहतात. त्या काळातील सर्व इमारती लोड-बेअरिंग पद्धतीने उभारण्यात आल्या असल्याने आता त्यांची अवस्था अतिशय जीर्ण झाली आहे. काही ठिकाणी सिमेंटचे प्लास्टर निखळले असून भिंतींमध्ये झाडे उगवलेली दिसतात. अनेक ठिकाणी स्लॅब पडले किंवा गळू लागले आहेत, तर भिंतींना मोठ्या चिरा पडल्याने संरचनात्मक धोका निर्माण झाला आहे.या सर्व इमारतींच्या सहकारी गृहनिर्माण सोसायट्या विधिवत नोंदणीकृत आहेत.

मित्राचा 'नाईस डीपी' मेसेज, अंबरनाथमधील प्रसिद्ध महिला डॉक्टरवर पतीचा जीवघेणा हल्ला

ठाणे : अंबरनाथ येथील प्रसिद्ध रेडिओलॉजिस्ट डॉ. किरण शिंदे यांच्यावर त्यांच्या पतीनेच घरगुती वादातून थेट खलबता मारत जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना बुधवारी पहाटे घडली. शाळेतील मित्राने महिला डॉक्टरला 'नाईस डीपी' असा मेसेज केल्याच्या रागातून पतीने हल्ला केल्याचा आरोप आहे. त्यांच्या मुलाने बचाव केल्याने डॉ. शिंदे यांचा जीव वाचला. त्यांच्यावर बदलापूरच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आरोपी पतीला ताब्यात घेतले असून त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती. डॉ. किरण शिंदे या अंबरनाथ पश्चिम येथील गृहसंकुलात पती आणि दोन मुलांसह राहतात. गेल्या काही काळापासून त्या आणि त्यांचे पती यांच्यामध्ये कौटुंबिक वाद सुरू होते.बुधवारी पहाटे साडेचार वाजता डॉ किरण या घरात गाण्याचा रियाज करण्यासाठी उठल्या. त्यांच्या सांगण्यानुसार त्यावेळी पती विश्वंभर शिंदे मुलाच्या रुममध्ये शांत बसले होते. त्यांच्यासाठी चहा करण्यासाठी डॉ किरण स्वयंपाकघरात गेल्या. यावेळी त्यांच्यात आणि पतीमध्ये पुन्हा वाद झाला. एक दिवस अगोदर आम्ही माथेरानला गेलो होते. त्यावर माझ्या शाळेतल्या फ्रेण्डने नाईस डीपी असं पाठवलं होतं. त्यांच्या मनात याचा राग होता. याच वादातून विश्वंभर यांनी स्वयंपाकघरात येऊन किरण शिंदे यांचा गळा पकडला आणि त्यांच्या डोक्यात खलबत्त्याने जीवघेणी मारहाण सुरू केली. जोरजोरात ओरडायला सुरुवात केली.घाबरलेल्या डॉ. किरण यांचा आरडाओरडा ऐकून त्यांच्या मुलांनी स्वयंपाकघरात धाव घेत आईची सुटका केली.

तरीही विश्वंभर यांची मारहाण सुरुच होती. शेवटी किरण यांच्या डोक्यातून रक्त निघायला लागलं. कपडे रक्ताने माखले. मुलं उठली नसती तर कदाचित माझा जीवही गेला असता, असं डॉ किरण म्हणाल्या.या हल्ल्यात जखमी झालेल्या डॉ. किरण यांना तात्काळ बदलापूर येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी त्यांचा जबाब घेतला. अंबरनाथ पोलिस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. आरोपी पती विश्वंभर शिंदे याला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिली.

भोईर हत्या प्रकरणाला धक्कादायक वळण.. बॉयफ्रेंडच्या मदतीनं पतीचा काढला काटा

पुणे : चारित्र्यावर संशय घेणाऱ्या पतीचा पत्नीनेच गळा आवळून खून केला असल्याची धक्कादायक घटना २४ ऑक्टोबर शुक्रवारी पहाटे पुणे जिल्ह्यातील चिंचवड भागात उघडकीस आली. पोलिसांनी सामाजिक कार्यकर्ती असलेल्या आरोपी पत्नीला ताब्यात घेतलं असून या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली आहे. हत्या झालेल्या ४० वर्षीय व्यक्तीचं नाव नकुल भोईर असं आहे. पोलिसांनी त्याची २८ वर्षीय पत्नी चैताली नकुल भोईर हिला ताब्यात घेतलं आहे. मात्र, आता या हत्या प्रकरणाला एक धक्कादायक वळण लागलं आहे. पोलीस तपासात मोठी माहिती समोर आली आहे.

रागाच्या भरात असलेल्या पत्नीने पती नकुल यांचा कापडाने गळा आवळून खून केला, अशी माहिती सुरुवातीला समोर आली होती. मात्र, आता या हत्याकांडात तिचा मित्रही सहभागी असल्याचं उघड झालं आहे. पोलिसांनी अत्यंत वेगात तपासचक्रे फिरवून सत्य समोर आणलं आहे. याप्रकरणी चैताली आणि तिचा

प्रियकर सिद्धार्थ पवार या दोघांनाही बेड्या ठोकल्या आहेत. २४ ऑक्टोबर शुक्रवारी पहाटे नकुल भोईर यांची गळा आवळून हत्या करण्यात आली होती. सुरुवातीला ही घटना संशयास्पद वाटत नव्हती, मात्र पोलिसांनी कसून तपास सुरू केला.

तपासादरम्यान पोलिसांना नकुलची पत्नी चैताली हिच्यावर संशय आला. पोलिसांनी तिच्याकडे चौकशी केली असता, तिने हत्येची कबुली दिली आणि धक्कादायक माहिती समोर आली आहे.चैतालीने तिचा प्रियकर सिद्धार्थ दीपक पवार याला सोबत घेऊन नकुलची हत्या केल्याचं उघड झालं आहे. चिंचवड पोलिसांनी तात्काळ कारवाई करत सिद्धार्थला अटक केली आहे.

डिजिटल अटकेमुळे ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू

पुणे : नामांकित विमान कंपनीशी संबंधित मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराच्या गुन्ह्यात तुमच्या बँक खात्याचा वापर झाल्याची भीती दाखवून सायबर चोरट्यांनी उच्चपदस्थ पोलिस अधिकाऱ्यांची नावे वापरून ज्येष्ठ दाम्पत्याला तीन दिवस डिजिटल अटक करून त्यांच्याकडून एक कोटी १९ लाख रुपये उकळले. दरम्यान, या धक्क्याने नैराश्यावस्थेत गेलेल्या ८२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाचा ऐन दिवाळीत भाऊबीजेच्या दिवशी मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.या प्रकरणी टिंगरेनगर येथे राहणाऱ्या ८० वर्षीय महिलेने सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार, सायबर चोरट्यांविरोधात फसवणूक, तोतयेगिरी, सरकारी अधिकारी असल्याची बतावणी करून फसवणूक या भारतीय न्याय संहितेच्या कलमांसह माहिती-तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. हा ऑनलाइन फसवणुकीचा प्रकार १६ ऑगस्ट ते १७ सप्टेंबर दरम्यान घडला.तक्रारदार टिंगरेनगर येथील एका सोसायटीत राहतात. त्यांच्या तीन मुली अमेरिकेत असतात.

तळोजात २१ वर्षीय विवाहितेनं संपवलं जीवन, सासरच्या सहा जणांवर गुन्हा

नवी मुंबई : हुंडाबळीविरोधी कडक कायदे असतानाही छळामुळे आणखी एका विवाहितेने आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना तळोजातील नावडे परिसरात उघडकीस आली आहे. वैशाली विनायक पवार (२१) असे या विवाहितेचे नाव असून २८ ऑक्टोबरला तिने सासरच्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. तळोजा पोलिसांनी याची गंभीर दखल घेऊन मृत विवाहितेच्या सासरकडील सहा जणांविरोधात हुंडाबळीचा गुन्हा दाखल करून पती व सासू-सासरे यांना अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वैशालीचे लग्न १० मे २०२३ रोजी तळोजा येथील नावडे गावात राहणाऱ्या उमेश पवार याच्याशी झाले होते. लग्नावेळी पती व सासरकडील नातेवाईकांच्या मागणीनुसार वैशालीच्या कुटुंबाने अडीच लाख रुपयांचा हुंडा व सोन्याचे दागिने दिले होते. मात्र तरीही कारखरेदीसाठी माहेरहून आणखी एक लाख रुपये आणावेत, यासाठी वैशालीचा छळ करण्यात येत होता.मात्र त्यानंतरही वैशालीचा पती उमेश पवार, सासू अरुणा पवार, सासरे रमेश पवार, नणंद सोनू राठोड, दुसरी नणंद नेहा राठोड व मेहुणा कृष्णा राठोड हे सर्वजण तिला पैशांसाठी सतत छळत होते. पती व नातेवाईकांकडून सतत होणारी मारहाण, शिवीगाळ आणि आर्थिक छळामुळे वैशाली मानसिकदृष्ट्या खचली होती. याच छळाला कंटाळून वैशालीने मंगळवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास नावडे गाव येथील त्रिवेणी संकुलातील घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. तळोजा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन वैशालीचा मृतदेह पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवून दिला.या घटनेनंतर वैशालीचे वडील विनायक राठोड यांनी तळोजा पोलिस ठाण्यात वैशालीच्या पतीसह सासू-सासरे, नणंद व इतरांविरोधात तक्रार दाखल केली. तळोजा पोलिसांनी बीएनएस कलम८ ०(२), ३(५) हुंडाबळी प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला.

महिला डॉक्टर मृत्यू प्रकरण; झडख गोपाल बदनेच्या अडचणीत वाढ, लपवलेला मोबाईल जप्त, मोठी माहिती मिळणार?

सातारा : फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात आता वेगवेगळी माहिती समोर येत आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी प्रशांत बनकर आणि पीएसआय गोपाल बदने पोलीस कोठडीत आहेत. पोलीस त्यांची कसून चौकशी करत आहे. पण आता आरोपी पीएसआय गोपाल बदनेचा पाय आणखी खोलात गेला असल्याचं समोर आलं आहे. पीएसआय गोपाल बदनेने लपवलेला मोबाईल पोलिसांनी जप्त केला आहे. बदनेच्या नातेवाईकांनी फलटण शहर पोलीस ठाण्यात मोबाईल जमा केला आहे. बदनेच्या मोबाईलमुळे महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात तपासाला वेग मिळणार आहे.

महिला डॉक्टरने आत्महत्या करण्यापूर्वी गोपाल बदने आणि प्रशांत बनकर या दोघांवर मानसिक व शारिरीक छळाचा आरोप केला होता. याबाबत त्यांनी हातावर नोट लिहिली होती. डॉक्टरच्या आत्महत्येनंतर पोलिसांनी तातडीने प्रशांत बनकरच्या घरी जाऊन त्याला अटक केली. त्यानंतर गोपाल बदने हा दोन दिवस फरार होता. पहिले तो पंढरपूर येथे गेला, त्यानंतर सोलापूर आणि मग कुटुंबीयांना भेटण्यासाठी बीडला गेला. त्यानंतर तो फलटण पोलीस ठाण्यात येऊन सरेंडर झाला. मात्र, सरेंडर होताना गोपाल बदनेने फोन जमा केला नाही. त्याने चालाखीने तो फोन कुठेतरी लपवला होता.फलटण येथे घडलेल्या धक्कादायक घटनेनं संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका महिला डॉक्टरने गुरुवारी २३ ऑक्टोबर रात्री एका हॉटेलच्या खोलीत गळफास घेऊन जीवन संपवलं. आत्महत्येपूर्वी त्यांनी आपल्या हातावर काही मजकूर लिहून ठेवला होता, ज्यामध्ये निलंबित पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदने याच्यावर चारवेळा लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर आरोप केला होता.या प्रकरणामुळे वैद्यकीय आणि पोलीस वर्तुळात खळबळ उडाली आहे. गेल्या काही महिन्यांपासून पीडित महिला डॉक्टर आणि फलटण पोलिसांमध्ये तणावाचं वातावरण होतं. या पार्श्वभूमीवर दोघांकडूनच प्रशासकीय स्तरावर तक्रारी करण्यात आल्या होत्या. दरम्यान, आरोपी पोलिस अधिकाऱ्यांच्या वैद्यकीय तपासणीसाठी फलटण पोलीस ठाण्याचे तत्कालीन निरीक्षक महाडिक यांनी जिल्हा आरोग्य विभागाशी संपर्क साधला होता. या चौकशीत महिला डॉक्टरने संबंधित पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध अनेक गंभीर आरोप नोंदवले होते.

पहिल्या T20 सामन्यावर फेरलं पाणी

ओव्हल : भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पाच टी-२० सामन्यांची मालिका सुरु आहे. या मालिकेतील पहिला टी-२० सामना मनुका ओव्हलमध्य खेळवला गेला. भारताने नाणेफेक गमावली. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकली आणि प्रथम बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला. सामना सुरु झाला आणि काही वेळातच थांबला. फक्त ५८ चेंडूचा खेळ रंगला आणि पहिला सामना रद्द झाला.

कॅनबेरामधील पावसाने क्रिकेट चाहत्यांचे मन दुखावले आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिला टी-२० सामना रद्द करण्यात आला आहे. पावसामुळे फक्त ५८ चेंडू खेळता आले. या काळात टीम इंडियाने एका विकेटच्या मोबदल्यात ९७ धावा केल्या. कर्णधार सूर्यकुमार यादव आणि शुभमन गिल चौकार आणि षटकारांचा वर्षाव करत होते, परंतु १० व्या षटकात वादळ सुरू झाले आणि मुसळधार पाऊस सुरू झाला. पाऊस कमी होण्याची सुमारे दीड तास वाट पाहिल्यानंतर सामना रद्द घोषित करण्यात आला.

कॅनबेरा टी-२० मध्ये आधीच पाऊस अपेक्षित होता. सामना वेळेवर सुरू झाला असला तरी सहाव्या षटकात पाऊस आला आणि सुमारे अर्धा तास खेळ थांबवण्यात आला. त्यानंतर सामना प्रत्येकी १८ षटकांपर्यंत कमी करण्यात आला. पावसानंतर सामना पुन्हा सुरू झाला तेव्हा सूर्या आणि गिलने आक्रमक फलंदाजी करण्यास सुरुवात केली. दोघेही ऑस्ट्रेलियन गोलंदाजांना जोरदार फटकावत होते, परंतु अचानक १० व्या षटकात पुन्हा मुसळधार पाऊस सुरू झाला. सामना पुन्हा सुरू होऊ शकला नाही. पाऊस सुरू झाला तेव्हा कर्णधार सूर्यकुमार यादव २४ चेंडूत ३९ धावांवर खेळत होता, त्याने तीन चौकार आणि दोन षटकार मारले. शुभमन गिल २० चेंडूत ३७ धावांवर खेळत होता, त्याने चार चौकार आणि एक षटकार मारला. भारताने फक्त ९.४ षटकांत १ बाद ९७ धावा केल्या होत्या. सूर्या मागील काही काळापासून फॉर्ममध्ये नव्हता. आता त्याला आजच्या सामन्यात चांगली सूर गवसला होता पण पावसामुळे हा सामना रद्द झाला.

दुखापतग्रस्त अय्यरची पहिली पोस्ट व्हायरल

मुंबई : भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज श्रेयस अय्यर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात झेल घेताना दुखापतग्रस्त झाला होता. त्याच्या बरगड्यांना दुखापत झाली असून अंतर्गत रक्तस्रावामुळे त्याला काही दिवस आयसीयूमध्येही राहावे लागले होते. आता तो बरा होत असून लवकरच मैदानावर परतण्याची शक्यता आहे. दुखापतीनंतर श्रेयस अय्यरने पहिली पोस्ट केली आहे. यामध्ये तो काय म्हणालाय जाणून घ्या.

सोशल मीडियावर श्रेयस अय्यरने एक पोस्ट शेअर केली आहे. 'मी सध्या रिकव्हर होत आहे आणि दिवसेंदिवस तब्येतीमध्ये सुधारणा होत आहे. मला दिलेल्या सर्व शुभेच्छा आणि पाठिंब्याबद्दल मी खूप आभारी आहे. त्या माझ्यासाठी खरोखर खूप महत्त्वाच्या आहेत. मला आठवणीत ठेवल्याबद्दल धन्यवाद, असं श्रेयस अय्यर म्हणाला. श्रेयस अय्यरला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात झेल घेताना दुखापत झाली होती. त्याच्या बरगड्यांना गंभीर दुखापत झाली होती. या दुखापतीमुळे त्याला अंतर्गत रक्तस्राव झाला होता. त्यामुळे त्याला काही दिवस आयसीयूमध्ये ठेवण्यात आले होते. आता त्याची प्रकृती सुधारत आहे आणि तो आयसीयूबाहेर आहे. श्रेयस अय्यर पुढील दोन महिने क्रिकेटपासून दूर राहणार आहे. त्यामुळे तो दक्षिण आफ्रिकेविरुद्ध घरच्या मैदानावर होणारी तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळू शकणार नाही. तसेच, जानेवारीमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतही त्याचे खेळणे निश्चित नाही, कारण तो त्यावेळी सरावापासून दूर असेल. या दुखापतीमुळे श्रेयस अय्यरची २०२६ च्या टी२० विश्वचषक संघात निवड होण्याची शक्यता कमी आहे. जरी तो टी-२० संघाचा भाग नसला तरी, दुखापतीमुळे त्याच्या जागी दुसऱ्या खेळाडूला संधी मिळण्याची दाट शक्यता आहे. टी२० विश्वचषक पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये खेळला जाणार आहे.

***

द. आफ्रिकेने इंग्लंडला चिरडले

मुंबई : द.आफ्रिकेने इंग्लंडचा १२५ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव करत महिला विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रथमच स्थान निश्चित केले आहे. झालेल्या पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात, कर्णधार लॉरा वोलवाड्र्टच्या शानदार शतकी खेळीच्या जोरावर द. आफ्रिकेने निर्धारित ५० षटकांत सात गड्यांच्या मोबदल्यात ३१९ धावांचा डोंगर उभा केला.

या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडचा संघ केवळ ४२.३ षटकांत १९४ धावांतच गारद झाला. या विजयात दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी मोलाची भूमिका बजावली. मारिजन कॅप हिने भेदक गोलंदाजी करत पाच बळी घेतले, तर नादिन डी क्लार्कने दोन गडी बाद केले. याव्यतिरिक्त आयबोंगा खाका, म्लाबा आणि सुने लूस यांनी प्रत्येकी एक-एक विकेट घेत संघाला ऐतिहासिक विजय मिळवून दिला. ३२० धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेला इंग्लंडचा संघ सुरुवातीपासूनच दबावाखाली दिसला. संघाचे पहिले तीन फलंदाज या सामन्यात शून्यावर बाद झाले. अशाप्रकारे शून्यावर दोन, तर एका धावसंख्येवर तीन फलंदाज पॅव्हेलियनमध्ये परतले होते. इथून संघाचे पुनरागमन अत्यंत कठीण राहिले.

परंतु, चौथ्या विकेटसाठी नॅट सीव्हर ब्रंट आणि एलिस कॅप्सी यांनी १०७ धावांची महत्त्वाची भागीदारी करत थोड्या आशा पल्लवित केल्या. मात्र, कॅप्सी आणि ब्रंट दोघीही अर्धशतक पूर्ण करून बाद झाल्यावर इंग्लंडचा संघ लवकरच संपुष्टात आला. कॅप्सीने ५० धावा केल्या, तर नॅट सीव्हर ब्रंटने ६४ धावा काढून आपली विकेट गमावली.

भारतासमोर ऑस्ट्रेलियाचे खडतर आव्हान, शेफालीला संधी की हरलीन देओलला बढती?

नवी मुंबई : सुदैवाची साथ लाभत आलेल्या यजमान भारतीय महिला संघाची गुरुवारी (दि. ३०) आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाविरुद्ध दुसरी सेमीफायनल होत आहे. या सामन्यात आठ वर्षांपूर्वी कर्णधार हरमनप्रीत कौरने केलेल्या अविस्मरणीय खेळीची पुनरावृत्ती संघाला अपेक्षित असेल. या लढतीला दुपारी ३ वाजता प्रारंभ होईल.

२०१७ मध्ये डर्बी-इंग्लंड येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध उपांत्य सामन्यात हरमनप्रीतने खेळलेली ११५ चेंडूंतील नाबाद १७१ धावांची खेळी त्यावेळी सामन्याला कलाटणी देणारी ठरली होती. आजच्या लढतीत ऑस्ट्रेलियाला आणखी एकदा धूळ चारण्यासाठी भारताला अशाच पराक्रमांची आवश्यकता असणार आहे. आजवर ७ वेळा विश्वविजेत्या ठरलेल्या ऑस्ट्रेलियन संघाला नमवणे आव्हानात्मक असले तरी सुदैवाची साथ आणि खेळाडूंना सूर सापडल्यास ते शक्य होऊ शकते, असा होरा आहे. भारताच्या कामगिरीत सातत्याचा अभाव असला तरी या महत्त्वाच्या लढतीत एकजिनसी खेळ साकारता आला तर ऑस्ट्रेलियन महिला संघाला पराभवाच्या खिंडीत रोखणे

शक्य होऊ शकेल. फलंदाजीत बहुतांशी अपयशी ठरलेली कर्णधार हरमनप्रीत, आठ वर्षांपूर्वी ऑस्ट्रेलियाविरुद्ध केलेल्या त्या तुफानी खेळीतून प्रेरणा घेण्याचा निश्चितच प्रयत्न करेल. याशिवाय, भारताच्या आशा स्मृती मानधनावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतील. तिने ६०.८३ च्या सरासरीने १ शतक व २ अर्धशतकांसह ३६५ धावा करत लक्षवेधी भूमिका बजावली आहे.

ऑस्ट्रेलियांच्या कौशल्याची किंवा चिकाटीची बरोबरी करू शकेल असा दुसरा संघ क्वचितच आहे. पण शेवटी, त्या दिवशी कोणता संघ सर्वोत्तम खेळतो हे देखील तितकेच महत्त्वाचे ठरते.

बाहुबली : द एपिक मधून तमन्नाच्या दृश्यांवर कात्री

मुंबई : एस एस राजामौली दिग्दर्शित 'बाहुबली' या मुव्ही सीरिजने प्रेक्षकांना अक्षरश: वेड लावले होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर हे दोन्ही चित्रपट हिट ठरले. गेल्या काही महिन्यात रीरीलिजचा ट्रेन्ड पाहायला मिळतो आहे. 'बाहुबली'देखील पुन्हा एकदा रीलिज होणार असून, दोन्ही भाग एकत्रित करुन हा सिनेमा रीलिज केला जाणार आहे. दोन्ही भागांचा मिळून एकच सिनेमा असल्याने, याआधी लोकप्रिय झालेली काही दृश्य 'बाहुबली: द एपिक'मधून हटवण्यात आली आहेत. तमन्ना भाटिया असणारी काही दृश्य सिनेमातून काढण्यात आली आहेत. अलिकडे राजामौली यांनी सिनेमातील कोणती दृश्ये कापली आहेत, याविषयी भाष्य केले.

प्रभास आणि राणा दग्गुबाती यांच्यासोबतच्या प्रमोशनल मुलाखतीत एसएस राजामौली म्हणाले, 'दोन्ही भाग एकत्र करून आणि रोलिंग टायटल काढून टाकल्यास, एकूण कालावधी सुमारे पाच तास आणि २७ मिनिटे झाला असता. मात्र, सध्याचे व्हर्जन ३ तास आणि ४३ मिनिटांचे आहे. काढून टाकण्यात आलेल्या प्रमुख भागांमध्ये अवंतिकाची शिवुदूसोबतची प्रेमकहाणी, 'पाचा बोटेसिना', 'कन्ना निदुरिंचरा' आणि 'इरुकुपो' यांचा समावेश आहे. युद्धाच्या भागांमधील अनेक दृश्ये देखील ट्रिम करण्यात आली आहेत.'त्यांनी पुढे म्हटले, ''बाहुबली'मधील प्रत्येक दृश्याचे एक भावनिक वजन आहे आणि त्याला कथनात्मक महत्त्व आहे. आम्हाला नवीन व्हर्जन पूर्णपणे कथेवर आधारित असावी असे वाटत होते. पहिला कट सुमारे चार तास दहा मिनिटांचा होता. आम्ही वेगवेगळी पार्श्वभूमी असणाऱ्या सिनेमाशी संबंधित असणाऱ्या आणि नसणाऱ्या प्रेक्षकांसाठी एक विशेष स्क्रीनिंग आयोजित केले, त्यांचा अभिप्राय घेतला आणि नंतर सिनेमा तीन तास ४३ मिनिटांपर्यंत कमी केला.'बाहुबली: द एपिक' च्या संकल्पनेविषयी राजामौली म्हणाले, 'आम्हाला पाच वर्षांपूर्वी ही कल्पना सुचली होती की, ही कथा एकाच चित्रपटात सांगता येईल का असा विचार होता. आम्ही एक अनुक्रमाने कथन करण्याचा प्रयत्न केला; तो यशस्वी झाला नाही. नंतर आम्ही दृश्य कमी केली, तेही यशस्वी झाले नाही. शेवटी, आम्ही काही एपिसोड काढून टाकण्याचा निर्णय घेतला.'

दिलजीला खलिस्तानी संघटनेकडून धमक्या

मुंबई : गायक आणि अभिनेता दिलजीत दोसांझ पुन्हा एकदा चर्चेत आलाय. दिलजीतनं नुकतीच कौन बनेगा करोडपती या शोमध्ये हजेली लावली होती. या मध्ये त्यानं केलेल्या एका कृतीवर आक्षेप घेत खलिस्तानी समर्थकांनी त्याला धमक्या दिल्या आहेत.

खलिस्तानी संघटना शीख फॉर जस्टिसनं पंजाबी गायक दिलजीत दोसांझ याच्या १ नोव्हेंबर रोजी ऑस्ट्रेलियात होणाऱ्या कॉन्सर्टपूर्वी त्याला धमक्या दिल्या आहेत. या दिवशी अकाल तख्त साहिबनं 'शीख नरसंहार स्मरण दिन' घोषित केला आहे.घइउ या शोमध्ये दिलजीतनं अनेक विषयांवर गप्पा मारल्या. यानंतर तो महानायक अमिताभ बच्चन यांच्या पाया पडला, आशीर्वाद घेतले. पण ही गोष्ट खलिस्तानी समर्थकांना खटकली अनब त्याला धमक्या दिल्या जात आहेत. दहशतवादी संघटनेनुसार, अमिताभ बच्चन यांनी ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी 'खून का बदला खून' अशा घोषणा दिल्या होत्या. त्यानंतर झालेल्या हिंसक जमावानं नरसंहार केला, ज्यात देशभरात ३०,००० हून अधिक शीख पुरुष, महिला आणि मुले मारली गेली. Sikhs for Justice चे जनरल कौन्सिल गुरपतवंत सिंग पन्नू म्हणाले, 'अमिताभ बच्चन, ज्यांच्या शब्दांनी या घटनेला चिथावणी दिली, त्यांचे पाय धरून दिलजीत दोसांझ यांनी १९८४ च्या शीख नरसंहारातील प्रत्येक पीडित, प्रत्येक विधवा आणि प्रत्येक अनाथ यांचा अपमान केला आहे. ही अज्ञानता नाही तर विश्वासघात आहे.

फिल्मफेअर पुरस्कार विकत घेतल्याचा आरोप करणाऱ्यावर भडकला अभिषेक

पुणे : मनोरंजन विश्वातील कलाकारांवर अनेकदा आरोप होतो की, प्रतिष्ठित पुरस्कार हे कलाकार विकत घेतात. अलिकडेच फिल्मफेअर पुरस्कारावर नाव कोरणाऱ्या अभिषेक बच्चनवरही असाच आरोप करण्यात आला आणि अभिनेत्याने त्यावर सडेतोड उत्तर दिलं. एक्स प्लॅटफॉर्मवर अभिषेकचा फोटो शेअर करत एका युजरने त्याच्यावर टीका केली होती, त्यानेही या प्लॅटफॉर्मवरच पोस्ट शेअर करत प्रत्युत्तर दिले आहे.अलिकडेच झालेल्या ७० व्या फिल्मफ ेअर सोहळ्यात अभिषेकला 'आय वॉन्ट टू टॉक' या सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना अभिषेकने भावुक प्रतिक्रियाही दिली होती, कारण २५ वर्षांच्या कारकिर्दीमध्ये त्याला पहिल्यांदाच हा पुरस्कार मिळाला. अभिनेत्यासाठी अत्यंत महत्वाच्या ठरलेल्या या पुरस्कारावरुनच त्याला टीका सहन करावी लागते आहे.या वर्षी 'आय वॉन्ट टू टॉक' या सिनेमासाठी पुरस्कार जिंकला... असा चित्रपट जो काही मोजक्या पैसे घेतलेल्या समीक्षकांशिवाय कोणीही पाहिला नाही आणि आता तर मला असेही ट्वीट दिसले की, २०२५ हे त्याचे वर्ष आहे. हे खूपच हास्यास्पद आहे! त्याच्यापेक्षा खूप चांगले कलाकार आहेत ज्यांना अधिक ओळख, काम, कौतुक आणि पुरस्कार मिळायला हवेत. पण दुर्दैवाने त्यांच्याकडे हुशार झठ आणि पैसा नाही.'टीकेवर उत्तर देताना अभिषेक असे म्हणाला की, 'मी कधीही कोणताही पुरस्कार विकत घेतलेला नाही किंवा झठ केलेला नाही. फक्त कठोर परिश्रम केले आहेत. पण, मी काहीही बोललो किंवा लिहिलं तरी तुम्ही त्यावर विश्वास ठेवाल अशी शंका आहे. म्हणून... तुमचे तोंड बंद करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे आणखी कठोर परिश्रम करणे, जेणेकरून भविष्यात पुन्हा कधीही कोणत्याही कामगिरीवर शंका उपस्थित करणार नाही.

गोल्डन डिपनेक ड्रेसमध्ये प्राजक्ताने शेअर फोटो, वेधले चाहत्यांचे लक्ष..

मुंबई : मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी हिचा प्रत्येक लूक चाहत्यांच्या चर्चेचा विषय ठरतो. पारंपरिक पेहरावात असो किंवा मॉडर्न आउटफिटमध्ये, प्राजक्ता नेहमीच आपल्या आत्मविश्वासपूर्ण आणि आकर्षक स्टाईलमुळे फॅन्सचे लक्ष वेधून घेते. नुकताच तिने आपल्या सोशल मीडियावर एक खास फोटो शेअर केला असून, तिचा गोल्डन गाऊन लूक सध्या चर्चेचा विषय बनला आहे. या फोटोमध्ये प्राजक्ताचा एलिगंट आणि रॉयल अंदाज पाहायला मिळतो. गोल्डन ऑफ-शोल्डर गाऊन, मिनिमल मेकअप आणि साधे दागिने या सगळ्यांनी एकत्र येऊन तिच्या सौंदर्याला वेगळाच ग्लो दिला आहे. पाहूया प्राजक्ताचा हा लूक कसा होता.

प्राजक्ताने परिधान केलेला गोल्डन ऑफ-शोल्डर गाऊन तिच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसा दिसतो. या आउटफिटमध्ये न चमकदार मेकअप, न अतिरेकी ॲक्सेसरीज. फक्त एक साधा पण एलिगंट गोल्डन ड्रेस. हलका शिमर, मऊ फॅब्रिक आणि फिटेड वेस्टलाइनमुळे हा गाऊन तिच्या ग्रेसफुल लूकला अधिक उठावदार बनवतो. हा लूक खास करून इव्हनिंग पार्टी, रेड कार्पेट इव्हेंट किंवा फ ेस्टिव्ह सीझनसाठी एक परफेक्ट पर्याय ठरू शकतो. प्राजक्ताने दाखवून दिलं आहे की साध्या डिझाईनचा गाऊन सुद्धा योग्य स्टायलिंगने किती उठावदार दिसू शकतो.या फोटोसोबत प्राजक्ताने दिलेलं कॅप्शन खूपच खास होतं ङ्गजश्रव ळी त्रेश्रवङ्ग. हे कॅप्शन तिच्या लूकइतकंच उठावदार ठरलं आहे. अनेक चाहत्यांनी या कॅप्शनवर प्रतिक्रिया देत लिहिलं, ङ्गखरंच, तूच गोल्ड आहेस! गोल्डन क्वीन!अशा कॉमेंट्सनी तिच्या पोस्टला भरभरून प्रेम दिलं आहे.या लूकमध्ये प्राजक्ताने मोठ्या स्टेटमेंट ज्वेलरीचा वापर न करता सोप्या पण उठावदार गोल्डन इयररिंग्स आणि ब्रॅसलेट घातले आहेत. या मिनिमलिस्टिक स्टाइलमुळे तिचा चेहरा आणि ड्रेस दोन्ही अधिक खुलून दिसतात. तिच्या दागिन्यांची निवड अगदी प्रसंगानुरूप आहे ना अतिरेकी, ना पूर्णपणे साधी, तर अगदी समतोल आणि क्लासी. अनेक वेळा झगमगत्या ड्रेससोबत जड दागिने घातल्यास लूकचा तोल बिघडतो, परंतु प्राजक्ताने अगदी योग्य प्रमाणात दागिने वापरून स्टाईल मंत्राचं उत्तम उदाहरण सादर केलं आहे. तिच्या गोल्डन इयररिंग्सनी चेहऱ्याच्या रचनेला उठाव दिला आहे, तर बारीक ब्रॅसलेटने संपूर्ण लूकला नाजूक आणि स्त्रीसुलभ स्पर्श दिला आहे.प्राजक्ताने या लूकसाठी हलका मेकअप निवडला आहे. न्यूड लिपशेड, थोडासा ब्लश आणि नाजूक आयलाइनर. तिचा टॉप बन हेअरस्टाइल या गाऊनसाठी परफेक्ट कॉम्बिनेशन ठरतो. ही हेअरस्टाइल चेहऱ्यायाची वैशिष्ट्ये अधिक उठावदार करते आणि संपूर्ण लूकला एक क्लासी टच देते.प्राजक्ताच्या या फोटोवर हजारो लाईक्स आणि शेकडो कॉमेंट्स पडल्या आहेत. चाहत्यांनी तिच्या स्टाईल सेन्सचं भरभरून कौतुक केलं आहे.या फोटोशूटमुळे पुन्हा एकदा सिद्ध झालं की प्राजक्ता माळी केवळ अभिनेत्री नाही, तर एक फॅशन आयकॉनही आहे ही गोष्ट सिद्ध झाली आहे.

***

निवृत्ती वेतन धारकांनी हयात प्रमाणपत्रावर ३० नोव्हेंबरपर्यंत स्वाक्षरी करावी

जनसंचलन/बुलढाणा

राज्य शासनाकडून जिल्ह्यातील सर्व निवृत्ती वेतन धारक, कुटूंब निवृत्ती धारक, माजी आमदार, इतर राज्य निवृत्ती वेतन धारकांनी ३० नोव्हेंबरपर्यंत बँकेमध्ये जावून विहीत नमुन्यातील हयात प्रमाण पत्रावर स्वाक्षरी करावी. तसेच स्वाक्षरीसोबत पॅन क्रमांक, आधार क्रमांक, बँक खाते क्रमांक नमुद करावा. संबधीत बँकेत विहीत नमुन्यातील हयात प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आले आहे. याबाबत निवृत्ती वेतन धारकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी ऋषिकेश वाघमारे यांनी केले आहे.

शिक्षक मतदारसंघाच्या नव्याने मतदार नोंदणीसाठी ६ नोव्हेंबरपर्यंत मुदत

पात्र शिक्षकांनी अर्ज सादर करण्याचे आवाहन...



जनसंचलन/बुलडाणा

शक्षक मतदारसंघासाठी मतदार याद्या नव्याने तयार करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने कार्यक्रम जाहीर केला आहे. या अनुषंगाने १ जानेवारी २०२५ हा अर्हता दिनांक निश्चित करण्यात आला असून, शिक्षक विधानपरिषद मतदारसंघातील सर्व पात्र शिक्षकांनी नव्याने मतदार यादीत नाव नोंदणीसाठी ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांनी केले आहे.या कालावधीत पात्र मतदारांनी आपली नावे नोंदवून घेणे अत्यावश्यक असून, कोणताही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये, याची दक्षता स्वतः मतदारांनी घ्यावी. मतदार नोंदणीसाठी पात्र व्यक्तींनी नमुना क्रमांक १९ मध्ये अर्ज सादर करावा. मतदार नोंदणी नियम, १९६० च्या नियम ३१ (४) नुसार प्रसिद्ध करण्यात आलेल्या नोटीशीची व्दितीय पुर्नप्रसिद्धी २५ ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात आली आहे. सदर नोटीस जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पंचायत समित्या, नगरपरिषद कार्यालये तसेच संबंधित संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. यासंबंधीचा सविस्तर तपशील मुख्य निवडणूक अधिकारी तसेच विभागीय आयुक्त कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविले आहे.

जिल्ह्यात कृत्रिम वाळू (एम-सॅण्ड) युनिट स्थापनेसाठी इच्छुकांनी अर्ज सादर करावे-जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांचे आवाहन

जनसंचलन/बुलडाणा

महसूल व वन विभागाच्या २३ मे २०२५ च्या शासन निर्णयानुसार एम-सॅण्ड (कृत्रिम याद) धोरण निश्चित करण्यात आले असून शासनाने याबाबतची मानक कार्यप्रणाली () निश्चीत केली आहे. त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यातील पहिल्या ५० इच्छुक पात्र अर्जदारांना एम-सॅन्ड बाबत विविध शासकीय सवलती देण्यात येणार आहेत. जिल्ह्यात कृत्रिम वाळू (एम-सॅन्ड) युनिट स्थापनेसाठी इच्छुकांनी अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केले आहे. औद्योगिक प्रोत्साहन अनुदान, व्याज अनुदान, वीज दर अनुदान, विद्युत शुल्क सवलत, मुद्रांक शुल्क माफी, रॉयल्टीमध्ये रु. ४०० रुपये प्रति ब्रास सवलत देवून (२०० रु प्रतिब्रास दराची तरतुद), शासन/निमशासकीय बांधकामांमध्ये सध्या एम-सॅन्डचा २० टक्के वापर बंधनकारक, टप्प्याटप्याने हे प्रमाण १०० टक्के एम-सॅण्ड वापर बंधनकारक आहे. मंजूर खाणपट्टा असलेले व्यक्ती/संस्था जर ङ्गङ्ग१०० टक्के एम-सॅण्ड उत्पादनङ्गङ्ग करणार असतील, तर त्यांनाही धोरणांतर्गत लाभ घेता येणार आहे. हे धोरण अस्तित्वात येण्यापूर्वी ज्यांनी ङ्गङ्ग१०० टक्के एम-सॅण्ड उत्पादनङ्गङ्ग सुरु केले आहे, त्यांनाही हेतूपत्राच्या दिनांकापासून धोरणांतर्गत लाभ घेता येणार आहे. कोणताही प्रकारचा खाणपट्टा नसलेले त्यांच्या खाजगी जमिनीवर इच्छुक ङ्गङ्ग१०० टक्के एम-सॅण्ड उत्पादकङ्गङ्ग अर्जदारांनी महाखनिज पोर्टलवर अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. शासकीय जमिनीवर खाणपट्टा लिलाव पद्धतीने दिला जाणार असून, केवळ १०० टक्के एम-सॅण्ड उत्पादकङ्गङ्ग, असलेल्यांनाच पात्रता राहील. शासकीय जमिनीवर लिलावात यशस्वी ठरलेल्या लिलावधारकाला एका वर्षात १०० टक्के एम-सॅण्ड युनिट कार्यान्वीत केल्यानंतर सवलती देय राहिल. प्रत्येक प्रकरणात ७/१२, वैयक्तिक अर्ज असल्यास आधारकार्ड, पॅनकार्ड, संस्थेचा अर्ज असल्यास संस्थेबाबतची कागदपत्रे, ५०० रुपये इतकी अर्ज फी, एम-सॅन्ड युनिट ज्या ठिकाणी स्थापन करावयाचे आहे त्याकरीता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळा () कडून प्राप्त सीटीई (), युनिटमधून १०० टक्के एम-सॅण्ड उत्पादित करण्याबाबतचे १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवरील हमीपत्र, एम-सॅण्ड उत्पादित करण्यासाठी दगड कोणत्या खाणपट्ट्यातून व इतर स्रोतांतून आणण्यात येणार आहेत त्या खाणपट्ट्याचा अथवा खोताचा तपशिल, नियोजन प्राधिकरणाचे नाहरकत प्रमाणपत्र, उद्योग आधार/जिल्हा उद्योग केंद्राची नोंदणी, तसेच आवश्यक परवानग्या अनिवार्य राहतील. अवैध उत्खनन वा वाहतूक प्रकरणात दोषी असलेल्यांना अर्ज करता येणार नाही. इच्छुक अर्जदार यांनी ३० दिवसाच्या आत अर्ज सादर करावे. तहनंतर पात्र अर्जदार यांना एम-सॅन्ड उत्पादन करण्यासाठी हेतूपत्र निर्गमित करण्यात येतील. हेतूपत्र निर्गमित केल्यानंतर युनिट सुरू करण्यासाठी सर्व आवश्यक परवानग्या घेऊन ६ महिन्यांच्या आत युनिट स्थापन करणे बंधनकारक आहे. विहित मुदतीत युनिट स्थापन न झाल्यास हेतूपत्र आपोआप रद्द होईल. अर्ज करण्यासाठी **https://mabakhanij.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर जाऊन हा पर्याय निवडुन त्यामधील - .- ( ) व ( ) असा लागु असेल तो पर्याय निवडुन अर्ज करावा. यापुर्वी अर्ज केला असला तरी नव्याने उपरोक्त नमुद कागदपत्रांसह अर्ज करणे आवश्यक राहिल.

बुलढाण्यात भगवान श्री सहस्त्रबाहू यांची जयंती मोठ्या हर्षोत्सवात साजरी!

जयस्वाल समाज बांधवांचा उत्साह शिगेला!

जनसंचलन/बुलढाणा

शहरात प्रथमच जयस्वाल युवा मंच तथा अखिल भारतीय जयस्वाल सर्व वर्गीय महासभा बुलढाणाच्या वतीने भगवान श्री सहस्त्रबाहू यांची जयंती मोठ्या हर्षोत्सवात साजरी करण्यात आली आहे. एका आख्यायिके नुसार, प्राचीन काळात महिष्मती (वर्तमान महेश्वर) नगरचे राजा कार्तवीर्य अर्जुन होते. त्यांनी भगवान विष्णुचा अवतार दत्तात्रेयला प्रसन्न करून १ हजार भुजांचे वरदान मागितले होते. तेव्हा पासून त्यांचे नाव सहस्त्रबाहु अर्जुन पडले. त्यांची जयंती शहरात मोठ्या उत्साहात पार पडली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष बजरंगलाल जयस्वाल होते. यावेळी बुलढाणा जयस्वाल समाजाचे अध्यक्ष अशोकलाल जयस्वाल, सहस्त्रार्जुन अधिवक्ता संघाचे राष्ट्रीय सचिव ॲड. राजेश जयस्वाल,अखिल भारतीय सर्ववर्गीय महासभाचे राष्ट्रीय कार्यकारी सचिव प्रशांत जयस्वाल, जयस्वाल युवा क्लबचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व बुलढाणा जयस्वाल युवा मंचचे अध्यक्ष संजय जयस्वाल यांची उपस्थिती होती. मंच द्वारा श्री भगवान सहस्त्रबाहु यांच्या जीवन चरित्रावर यावेळी मान्यवरांनी प्रकाश टाकला. समाज बांधवांकडून सहस्त्रबाहु अर्जुन यांची महाआरती करण्यात आली. दरम्यान अखिल भारतीय जयस्वाल सर्ववर्गीय महासभेच्या नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांचे यावेळी पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. सुत्र संचालन डॉ. गजानन जयस्वाल यांनी तर आभार सुरेंद्र जयस्वाल यांनी मानले. अल्पोपहाराची व्यवस्था सुरेंद्र जयस्वाल यांनी केली होती. नितीन जयस्वाल, रुपेश जयस्वाल, मयूर जयस्वाल तथा समाजबांधवांनी कार्यक्रमाच्या यशस्वतीयशस्वीतेसाठीसहकार्यकेले

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..

गुंतवणुक रक्कम		५००	१०००	१५००	२०००	३०००	५०००
अ.क्र.	गुंतवणुक कालावधी महिने	पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम					
१	१५६	१०३४१८	२०६८३६	३१०२५४	४१३६७२	६२०५०७	१०३४१७९
२	१४४	९५५४४	१९१०८८	२८६६३३	३८२१७७	५७३२६५	९५५४४२
३	१३२	८८२६९	१७६५३८	२६४८०६	३५३०७५	५२९६१३	८८२६८८
४	१२०	८१५४४	१६३०८७	२४४६३१	३२६१७५	४८९२६२	८१५४३६
५	१०८	७५३३६	१५०६७१	२२६००७	३०१३४२	४५२०१३	७५३३५५
६	९६	६५५९६	१३९१९३	२०८७८९	२७८३८६	४१७५७९	६९५९६५

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

अ.क्र.	मुदती ठेवीचे विवरण		लागू व्याजदर	पतसंस्था व इतर संस्था
१	१५ दिवस ते ९० दिवस		६.००%	६.००%
२	९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता)		६.५०%	५.००%
३	१८१ दिवस ते १३ महिने		६.००%	६.००%
४	१४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता)		७.००%	६.००%
५	आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता)		७.००%	६.००%
६	मासिक ठेव		७.००%	–
७	बचत ठेव	अ) रू. ३ लाखांपर्यंत	३.००%	–
		ब) रू. ३ लाखांचे वर	४.५०%	–

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

वय	गुंतवणूक रक्कम	मिळणारी रक्कम
जन्माच्या वेळी	१७०००	१०३६०९
१ वर्ष	१८०००	१००६५७
२ वर्ष	१९५००	१०००५२
३ वर्ष	२१५००	१०१२१७
४ वर्ष	२३५००	१०१५०९
५ वर्ष	२५५००	१०१०६४
६ वर्ष	२७५००	१००००३
७ वर्ष	३००००	१०००९७
८ वर्ष	३३०००	१०१०२७
९ वर्ष	३६०००	१०११२२
१० वर्ष	३९०००	१००५१५

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्री नंबर : १८००-३१३-२३२४

डोणगाव महामार्ग कुणाच्या बापाचा? दुकानांसमोरील अतिक्रमण कधी हटणार?

जनसंचलन/ डोणगाव

अतिक्रमणामुळे डोणगाव महामार्गावर वाहतूक कोंडीची समस्या उद्भवल्याने सर्व सामान्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. प्रशासकीय यंत्रणा मात्र हतबल दिसतेय. डोणगाव येथील महामार्गावर छोट्या मोठ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.रस्त्याच्या दुतर्फा दुकाने आहेत.त्यामुळे या रस्त्यावर नागरिकांची रेलचेल असते.दरम्यान वाहतूक कोंडीमुळे नागरिकांची गैरसोय होते.दुकानांसमोर अतिक्रमणे वाढतअसल्याने या समस्येत आणखी भर पडत आहे.त्यामुळे नागरिकांना वाहन उभे करण्यासाठी देखील जागा सापडत नाही.वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागते. याकडे यंत्रणेचे दुर्लक्ष असून, सदर अतिक्रमण हटवून रस्ता सुरळीत करण्यात यावा, अशी मागणी जोर धरु लागली आहे.

चोरलेल्या धनादेशाद्वारे रक्कम काढण्याचा प्रयत्न

जनसंचलन/ खामगाव

चोरलेल्या धनादेशावर बनावट सही करून बँक खात्यातून ४ लाख १२ हजार रुपये काढण्याचा प्रयत्न झाल्या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. जमिनीसंदर्भात व्यवहार सुरू असताना धनादेश चोरून पैसे काढण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे फिर्यादीचे म्हणणे असून, न्यायालयीन आदेशानुसार संबंधित कागदपत्रे फिर्यादीने सादर केल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. शहरात एका जमिनीच्या व्यवहार प्रकरणात डिसेंबर २०२४ ते जानेवारी २०२५ दरम्यान ही घडना घडली. २८ ऑक्टोबर २०२५ रोजी हे प्रकरण उघडकीस आले. जमीन व्यवहाराबाबत झालेल्या करारानुसार आरोपी शेख रशीद मेख इसराइल (४५, रा. पहुरजीरा, ह. मु, मेहबुब नगर, खामगाव) याने करारातील अटी पाळण्यात कसूर केला. त्याच्यासोबत असलेल्या व्यक्तीने फिर्यादीच्या बॅगमधून कोरा धनादेश चोरून घेतला. या धनादेशावर फिर्यादीची बनावट सही करून रक्कम त्याच्या बँक खात्यातून काढण्याचा प्रयत्न केला असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

चिखलीत केबल नेटवर्क कार्यालयास आग; २० लाखांचे नुकसान केबल्स, बॅटरी व इतर साहित्य आगीत खाक

जनसंचलन/ चिखली

शहरातील राजा टॉवर २८ कॉम्प्लेक्समध्ये असलेल्या एका केबल नेटवर्कच्या कार्यालयाला ऑक्टोबरच्या रात्री १० वाजताचे सुमारास अचानकपणे आग लागली. या घटनेमुळे कार्यालयातील केबल्स, बॅटरी आणि इतर उपकरणांचे सुमारे २० लाख रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या आगीचे नेमके कारण अद्याप कळू शकले नाही. केबल प्राप्त माहितीनुसार, नेटवर्कच्या कार्यालयामध्ये २८ ऑक्टोबरच्या रात्री १० वाजताचे सुमारास अचानक आग लागली. सदर आगीने रौद्र स्वरूप धारण केले व केबल नेटवर्कचे मुख्य केबल्स, बॅटरी युनिट्स आणि इतर महत्त्वाचे उपकरणे जाळून खाक झाले. यात सुमारे २० लाख आगामुळे असा धूर पसरला होता. रुपयांचे साहित्य जळून खाक झाले. चिखली अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि सुमारे अर्ध्या तासात आगीवर पूर्ण नियंत्रण मिळवले. यावेळी दत्ता खत्री, पार्थ व्यवहारे, अज्जू खान, मुजम्मील शेख, नीलय देशमुख, आकाश जयस्वाल, अदनान खान आदींनी आग विझविण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२८७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८